12 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# कॅशलेस संकल्पना समजावून घ्या

## डॉ. चंद्रशेखर ठाकूर : विद्यापीठात 'डिमोनेटायझेशन व कॅशलेस इकॉनॉमी' विषयावर कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

एकवीसाव्या शतकात होणारे बदल सामान्य माणसाने स्वीकारले पाहिजेत. कॅशलेस पध्दत साध्या भाषेत अशिक्षित माणसांना सांगितली पाहिजे. पानपट्टीपासून मोठमोठ्या हॉटेलिंगची सेवा पुरवणाऱ्या माणसापर्यंत कॅशलेस ही नवीन संकल्पना महत्त्वाची आहे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांनी कॅशलेस संकल्पना समजावून घेतली पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. चंद्रशेखर ठाकूर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'डिमोनेटायझेशन व कॅशलेस ईकॉनॉमी' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. ठाकूर म्हणाले, नुकताच गाजलेला आणि सर्वांना माहित असलेला मुद्दा नोटाबंदी आणि याच मुद्याने घेतलेले नवीन वळण ते म्हणजे कॅशलेस इकॉनॉमी आहे. नवीन संकल्पना समजावून घेताना व प्रत्यक्षात वापरताना होणारी घबराहट यांच्यापासून लांब राहिले पाहिजे. डिजिटल पेमेंट, एटीएम यांसारख्या सुविधा सामान्य माणसाला खूप सोप्या पध्दतीने चित्रीकरणाच्या माध्यमातून समजावून सांगितल्या. कॅशलेस पध्दत सर्वसामान्यांना समजली तर भ्रष्टाचार, लाचलुचपत, काळापैसा यासारख्या गोष्टींना आपण आळा घालू शकतो. तेव्हाच व्यवहारामध्ये पारदर्शकता येईल आणि आपण यापुढे येणाऱ्या सर्व नवीन गोष्टी वापरण्यास समर्थ होऊ. त्यासोबतच नवीन तंत्रज्ञान शिकताना होणाऱ्या चुका कशा टाळायच्या याबद्दल सविस्तर माहिती दिली. प्रत्येक माणसाला कॅशलेस पध्दत फायदेशीर आहे. याबद्दलची सामान्य माणसाच्या मनामध्ये असणारी भीती कमी झाली पाहिजे, असेही डॉ. ठाकूर यांनी सांगितले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागातर्फे आयोजित 'डिमोनेटायझेशन व कॅशलेस इकॉनॉमी' या विषयावरील कार्यशाळेचे उद्घाटन करताना डॉ. चंद्रशेखर ठाकूर. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. विजय ककडे, आदी.

दुसऱ्या सत्रात कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. आर. के. कामत यांनी ई-पेमेंट व मोबाईल बँकिंग या विषयावर मार्गदर्शन केले. ई-कॉमर्स, ई-कॅश, ई-क्रेडिट, कार्ड प्रोसेसिंग, डिजिटल मनी याविषयी विवेचन केले. यावेळी अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. विजय ककडे, प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# शिवाजी विद्यापीठात आजपासून चर्चासत्र

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त गुरुवारपासून (ता. १२) 'आधुनिक भारताच्या विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाची प्रस्तुतता' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र होत आहे.

चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी विजापूर (कर्नाटक) येथील प्रा. डॉ. पी. कन्नान यांचे बीजभाषण होणार आहे. बीसीयूडी डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी असतील. महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडू, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, गुजरात या राज्यांमधील सत्तरहून अधिक संशोधक शोधनिबंध सादर करणार आहेत. चर्चासत्रात डॉ. आंबेडकर यांच्या आर्थिक धोरणांचा भारताच्या विकासामधील योगदान, त्यांच्या आर्थिक विचारांचे परीक्षण, देशाच्या संविधानाच्या रचनेमधील त्यांची भूमिका, शिक्षणतज्ज्ञ अशा विविध पैलूंवर सविस्तर चर्चा होणार आहे अशी माहिती विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 JAN 2017

लोकमत

# विद्यापीठात आजपासून आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागात आज, गुरुवारी व उद्या, शुक्रवारी आंतरराष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. चर्चासत्राचा विषय 'प्रवासी हिंदी साहित्य और मानव अधिकार' असा आहे.

विद्यापीठातील वि. स. खांडेकर सभागृहात आज सकाळी ११ वाजता मोका (मॉरिशस)मधील महात्मा गांधी संस्थानचे प्रा. गुलशन सुखलाल यांच्या हस्ते उद्‌घाटन होईल. यावेळी अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील. चर्चासत्रात प्रवासी हिंदी साहित्य, संकल्पना, प्रवासी हिंदी लेखनाची पृष्ठभूमी आणि स्वरूप; इंग्लंड, अमेरिका, कॅनडाचे प्रवासी हिंदी साहित्य आणि मानवाधिकार, कॅरेबियन प्रवासी हिंदी साहित्य आणि मानवाधिकार, सूरीनाम, मॉरिशस, गयाना प्रवासी हिंदी साहित्य आणि मानवाधिकार, त्रिनिदाद आणि टोबॅगो व फिजीचे प्रवासी हिंदी साहित्य आणि मानवाधिकार, प्रवासी साहित्याचे महत्त्व, हिंदी साहित्यातील स्थान, तसेच प्रवासी हिंदी साहित्य विचारप्रवाहाची आवश्यकता या उपविषयांवर चर्चा होईल.

यात अमेरिका, कॅनडा, सूरीनाम, मॉरिशस, गयाना, त्रिनिदाद आणि टोबॅगो, फिजी आणि भारतातील महाराष्ट्र, केरळ, पश्चिम बंगाल, आसाम, गुजराथ, राज्यांतील संशोधक सहभागी होतील, अशी माहिती हिंदी विभागप्रमुख प्रा. पद्मा पाटील व डॉ. प्रदीप लाड यांनी दिली. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 JAN 2017

लोकमत

# वि. स. खांडेकर यांना अभिवादन

**कोल्हापूर :** साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी शिवाजी विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठातील वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयातील त्यांच्या प्रतिमेला कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमास खांडेकर यांच्या कन्या मंगलताई पेंढारकर, जावई कर्नल शशिकांत पेंढारकर, विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. राजन गवस, एन.एस.एस.चे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, एन. जे. बनसोडे, नंदकुमार मोरे, नीलांबरी जगताप, प. ना. पोतदार, राम देशपांडे, आदी उपस्थित होते. दरम्यान, जयंतीदिनी दुपारी तीन वाजता वि. स. खांडेकर लिखित 'माणसाला पंख असतात' या चित्रपटाचे सादरीकरण झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2017

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात सह्याद्री व्याघ्र प्रकल्प वर्धापन दिन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभाग आणि वन विभाग यांच्यावतीने शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागात नुकताच सह्याद्री व्याघ्र प्रकल्प वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

तंत्रज्ञान विभागात झालेल्या या कार्यक्रमाला मानद वन्यजीव रक्षक रमण कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची माहिती दिली. सात वर्षांत या प्रकल्पात झालेली कामे, वनांच्या परिसरात असलेल्या गावात राबवलेली शामाप्रसाद मुखर्जी जन वन योजनेंतर्गत झालेल्या कामांची माहिती त्यांनी दिली. वन विषयासंदर्भातील रस असणाऱ्या जाणकारांची मोठी उपस्थिती होती.

विद्यार्थिनींनी वाघाच्या प्रतिकृतीसोबत सेल्फीज टिपण्याचा आनंद लुटला. प्रा. अमोल कुलकर्णी यांनी स्वागत केले. विभागप्रमुख श्रीकांत भोसले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

# 'नॅक' परिणामांबाबत होणार चर्चा

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ व केआयटीचे अभियात्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'नॅक पुरस्कृत मूल्यांकन व परीक्षणाचा उच्च शैक्षणिक संस्थावर होणारा परिणाम' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे आयोजन १३ व १४ जानेवारी रोजी होणार आहे.

परिषदेस चेन्नई येथील आण्णा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आदिनारायण कलानिधी प्रमुख उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी बीसीयुडीचे संचालक व प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे भूषविणार आहेत.

पहिल्या दिवसाचे सत्र शिवाजी विद्यापीठात होणार असून १४ जानेवारी रोजीचे दुसरे सत्र केआयटी कॉलेजमध्ये होणार आहे. दुसऱ्या दिवशीच्या सत्रात डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी, विद्यापीठाच्या आय.क्यु.ए.सी.चे संचालक डॉ. आर. के. कामत, डॉ. सी. के. कोकाटे यांची मार्गदर्शनपर व्याख्याने होतील. चर्चासत्राच्या समारोपासाठी डॉ. सी. के. कोकाटे, कुलगुरू, के.एल.ई. विद्यापीठ, बेळगांव हे प्रमुख पाहुणे असतील. विविध सत्रांमध्ये डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. एस. वाय. होनगेकर यांची मार्गदर्शनपर व्याख्याने होतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स



शिवाजी विद्यापीठाचा विजेता फुटबॉल संघ.

# विद्यापीठ संघाला विजेतेपद

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



हृषीकेश मेथे

भोपाळ (मध्य प्रदेश) येथे सुरू असलेल्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ पुरुष फुटबॉल संघाने जबलपूरच्या राणी दुर्गावती विद्यापीठाचा ३-२ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. शिवाजी विद्यापीठ संघाची मिदनापूर (पश्चिम बंगाल) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संघाचा कर्णधार हृषीकेश मेथे-पाटील याने या सामन्यात हॅटट्रिक नोंदवून संघाला विजेतेपद मिळवून दिले. स्पर्धेतील त्याची ही तिसरी हॅटट्रिक आहे.

अतिशय चुरशीने झालेल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघावर सामन्याच्या दहाव्या मिनिटालाच गोल झाला होता. त्यामुळे संघाची लय बिघडली. पण, संघातील खेळाडूंनी स्वतःला सावरत जोरदार आक्रमण सुरू केले. त्याचा

**आंतर विद्यापीठ फुटबॉल स्पर्धा**

त्यांना फायदाही झाला. सामन्याच्या १७व्या मिनिटाला हृषीकेशची आणि २०व्या मिनिटाला करण चव्हाण-बंदरे यांच्या चांगल्या संधी वाया गेल्या. सामन्याच्या २८व्या मिनिटाला राहुल पाटीलच्या पासवर हृषीकेशने गोल करून संघाला बरोबरी साधून दिली. हृषीकेशने उजव्या बाजूने जोरदार आक्रमण करून वैयक्तिक दुसरा गोल करत संघाला २-१ असे आघाडीवर नेले. सामना संपण्यास २० मिनिटे बाकी असताना जबलपूर संघाला मोठ्या डी बाहेरून फ्री किक मिळाली. त्यांनी ही संधी दवडली नाही. आणि सामन्यात बरोबरी साधली. सामना टायब्रेकरवर जाईल, अशी शक्यता वाटत असताना शिवाजी विद्यापीठाचा खेळाडू शुभम साळोखेने एक जोरदार फटका मारला. चेंडू जबलपूरच्या गोलपोस्टला लागून पुन्हा मैदानात हृषीकेशकडे आला. यावर गोल करत हृषीकेशने संघाला ३-२ असा विजय मिळवून दिला. संघाला प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे व व्यवस्थापक प्रा. एन आर कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

12 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# विद्यापीठाचा संघ अ. भा. स्पर्धेसाठी पात्र

## पात्रता फेरीत जबलपूर संघावर ३-२ ने मात : ऋषीकेश मेथे-पाटीलची हॅट्ट्रिक

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेच्या पात्रता फेरीत अनुभवी जबलपूरच्या राणी दुर्गावती विद्यापीठ संघाचा ३ विरुद्ध २ अशा गोलफरकाने पराभव करून शिवाजी विद्यापीठ संघाने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली. शिवाजी विद्यापीठाकडून तिन्ही गोल ऋषीकेश मेथे-पाटील याने नोंदवत स्पर्धेतील तिसरी हॅट्ट्रिक नोंदविली.



**कोल्हापूर : पश्चिम विभागीय फुटबॉल स्पर्धेत सलग पाच सामने जिंकून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध करणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ. सोबत प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे, संघ व्यवस्थापक एन. आर. कांबळे.**

भोपाळ (मध्य प्रदेश) येथे झालेल्या पश्चिम विभागीय स्पर्धेत सलग पाच सामने जिंकत कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठ संघाने मिदनापूर (पश्चिम बंगाल) येथे होणाऱ्या स्पर्धेत दिमाखात प्रवेश केला. महत्त्वपूर्ण असल्याने चुरशीच्या सामन्यात १० व्या मिनिटाला जबलपूरकडून शिवाजी विद्यापीठावर पहिला गोल झाला. यामुळे सुरुवातीचा काही काळ विस्कळीत खेळ झाला. काही वेळाने सावरत शिवाजीकडून योजनाबद्ध चढाया आणि आक्रमक खेळाचा अवलंब करण्यात आला. १७ व्या मिनिटाला ऋषीकेश मेथे-पाटीलची, तर २० व्या मिनिटाला करण चव्हाण-बंदरे यांच्या प्रयत्नांना अपयश आले. लागोपाठ होणाऱ्या चढायांमुळे जबलपूरचा संघ भांबावून गेला. २८ व्या मिनिटाला राहुल पाटीलच्या पासवर ऋषीकेशने गोल नोंदवत सामना १-१ असा बरोबरीत केला. ३५ व्या मिनिटाला झालेल्या चढाईत ऋषीकेशने वैयक्तिक व संघाचा दुसरा गोल केला. जबलपूरला मिळालेल्या फ्री किकचा पुरेपूर फायदा उठवत गोलची परतफेड झाल्याने मध्यंतरापर्यंत सामना २-२ असा बरोबरीत झाला. यामुळे उत्तरार्धात सामना अधिकच रंगतदार बनला. सामना संपण्यास ५ मिनिटाचा अवधी असताना शिवाजी विद्यापीठाकडून झालेल्या चढाईत शुभम साळोखेने मारलेला जोरदार फटका गोलपोस्टला तटून परतला. रिबाँड बॉलवर ऋषीकेशने वैयक्तिक आणि संघाकडून तिसरा गोल नोंदवत सामना ३-२ असा जिंकला.

विजयी संघात रविराज यादव, पवन माळी, अनिमेश होले, राहुल पाटील, ऋषीकेश मेथे-पाटील, अक्षय मेथे-पाटील, संकेत वेसणेकर, ओंकार जाधव, दिग्विजय वाडेकर, आकाश मेस्त्री, सागर पोवार, साहिल निंबाळकर, शुभम साळोखे, सिद्धेश यादव, वृषभ ढेरे, करण चव्हाण-बंदरे, ओंकार साळवी, अनिल शिकलगार, प्रतीक बदामे, श्रेयस मोरे यांचा समावेश आहे. सर्वांना प्रशिक्षक प्रा. डॉ. अभिजित वणिरे, व्यवस्थापक प्रा. एन. आर. कांबळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

12 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा दणका

## जबलपूर संघावर ३-२ ने मात ऋषीकेश मेथेची स्पर्धेतील दुसरी गोलची हॅट्ट्रिक



कोल्हापूर : मिदनापूर (प. बंगाल) येथे होणाऱ्या अ. भा. आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ. सोबत प्रशिक्षक आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

भोपाळ, मध्यप्रदेश येथे सुरु असलेल्या पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेतील महत्त्वपूर्ण लढतीत शिवाजी विद्यापीठ पुरुष फुटबॉल संघाने जबलपूरच्या राणी दुर्गावती विद्यापीठाचा ३-२ अशा गोलफरकाने पराभव केला. या विजयामुळे शिवाजी विद्यापीठ संघाची मिदनापूर (प. बंगाल) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

शिवाजी विद्यापीठ संघाचा ऋषीकेश मेथे-पाटील याने सामन्यात तीन गोलकरत संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. विशेष म्हणजे, या वर्षात सातत्याने चमकदार कामगिरी करणाऱ्या ऋषीकेशने या स्पर्धेत दुसऱ्यांदा हॅट्ट्रिक साधण्याची किमया साधली आहे.

**अ.भा. आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ पात्र**

अतिशय चुरशीने खेळल्या गेलेल्या सामन्यात १० व्या मिनिटलाच शिवाजी विद्यापीठ संघावर गोल झाला. गोलची परतफेड करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ संघाकडून खेळाडूंकडून आक्रमक चढाया करण्यात आल्या. १७ व्या मिनिटाला ऋषीकेशची तर २० व्या मिनिटाला करण बंदरेची गोलकरण्याची सोपी संधी वाया गेली. शिवाजी विद्यापीठ संघाकडुन आक्रमक चढाया सुरुच होत्या. सामन्याच्या २८ व्या मिनिटाला राहूल पाटीलच्या पासवर ऋषीकेशने गोल करत सामना १-१ असा बरोबरीत आणला.

यानंतर, लगेचच ३५व्या मिनिटाला ऋषीकेशने मैदानी गोल करत संघचा आणि वैयक्तीक दूसरा गोल करत सामन्यात आघाडी मिळवून दिली. पुर्वाधात शिवाजी विद्यापीठ संघ २-१ असा आघाडीवर होता.

उत्तरार्धात दोन्ही संघाकडून गोल करण्यासाठी प्रयत्न सुरु होते. सामन्याच्या ७० व्या मिनिटाला जबलपूर संघास फ्री किक मिळाली. या संधीचा फायदा उठवत जबलपूर संघाने सामन्यात २-२ अशी बरोबरी केली. सामना संपायला ५ मिनिटे बाकी असताना, सामना टायब्रेकरवर जाणार असे वाटत असताना शुभम साळोखे याने जोरदार चढाई करत मारलेला फटका गोलखांबाला ल[...] परत मैदानात आला. या चें[...] ऋषीकेश ताबा मिळवत, गोल नों[...] संघाला ३-२ अशी आघाडी मि[...] दिली. तसेच स्पर्धेतील दुसरी हॅ[...] त्याने केली. अखेर सामना शि[...] विद्यापीठाने ३-२ अशा गोलफर[...] जिंकला. शिवाजी विद्यापीठ संघा[...] ऋषीकेश मेथे-पाटील, करण [...] अक्षय मेथे-पाटील, ऋषभ ढेरे [...] चांगला खेळ केला.

याआधी गत सामन्यात शि[...] विद्यापीठाने मुंबई विद्यापी[...] १-० असे पराभूत केले होते. [...] स्पर्धेतील शिवाजीचा हा प[...] विजय आहे. यापूर्वी त्यांनी उद[...] संघावर ५-१, सोलापूरवर ७-०, [...] संघावर २-१ असा विजय मिळव[...] आहे.

12 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

**प.विभागीय स्पर्धा : 'जबलपूर'चा ३-२ ने पराभव; मेथे-पाटीलची हॅट्‌ट्रिक**

# राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ पात्र



मेथे-पाटील

**कोल्हापूर :** भोपाळ (मध्यप्रदेश) येथे सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या फुटबॉल संघाने जबलपूरच्या राणी दुर्गावती विद्यापीठाचा ३-२ असा पराभव केला. या कामगिरीमुळे विद्यापीठ संघाची मिदनापूर (पश्चिम बंगाल) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली.

भोपाळ येथील बरकतउल्ला विद्यापीठाच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेतील महत्त्वाचा हा सामना जबलपूरच्या राणी दुर्गावती विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ संघांत झाला. अतिशय चुरशीने खेळलेल्या या सामन्यात १० व्या मिनिटाला अनपेक्षितरीत्या जबलपूर संघाकडून शिवाजी विद्यापीठ संघावर गोल झाला. या गोलनंतर शिवाजी विद्यापीठ संघाचा खेळ काहीसा विस्कळित झाला. यातून सावरत शिवाजी विद्यापीठ संघाच्या ह्रषिकेश मेथे-पाटील व करण चव्हाण-बंदरे या दोघांची गोल करण्याची संधी १७ व्या मिनिटास वाया गेली. २८ व्या मिनिटाला पुन्हा 'शिवाजी'च्या ह्रषिकेश मेथे-पाटीलने राहुल पाटील याच्या पासवर गोल करीत सामन्यात १-१ अशी बरोबरी साधली. बरोबरीनंतर जबलपूरचा संघाचा खेळ काहीसा विस्कळित झाला. त्यातून 'शिवाजी'च्या संघाकडून आक्रमक व वेगवान चाली सातत्याने रचल्या गेल्या. ३५ व्या मिनिटाला पुन्हा ह्रषिकेशने वैयक्तिक व संघाचा दुसरा गोल नोंदवीत सामन्यात २-१ अशी सरशी मिळवून दिली.

पूर्वार्धात दोन्ही संघांकडून आक्रमक खेळाचे प्रदर्शन झाले. सामना संपण्यास २० मिनिटे बाकी असताना जबलपूर संघास गोल करण्याची संधी मिळाली. यावर जबलपूरने सामन्यात २-२ अशी बरोबरी साधली. सामना टायब्रेकरवर जाणार असे वाटत असतानाच व सामना संपण्यास काही मिनिटे शिल्लक असताना 'शिवाजी'कडून शुभम साळोखेने जबलपूरच्या गोलजाळ्याकडे चेंडू मारला. तो गोलपोस्टला अडून मागे आला. मागे उभ्या असलेल्या ह्रषिकेश मेथे-पाटीलने ही संधी साधत चेंडू अलगद गोलजाळ्यात ढकलला. त्यामुळे हा सामना शिवाजी विद्यापीठ संघाने ३-२ असा जिंकत अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेचे तिकीट मिळविले. या सामन्यात ह्रषिकेश यांच्यासह अक्षय मेथे-पाटील, वृषभ ढेरे, करण चव्हाण-बंदरे, ओंकार साळवी, साहिल निंबाळकर यांचा खेळ चांगला झाला.



भोपाळ (मध्यप्रदेश) येथील बरकत उल्ला विद्यापीठाच्या मैदानावर सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत अखिल भारतीय विद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या शिवाजी विद्यापीठ फुटबॉल संघासोबत प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे, व्यवस्थापक एन. आर. कांबळे उपस्थित होते.

## विजयी संघ असा

या संघामध्ये अक्षय मेथे-पाटील (कर्णधार) रविराज यादव, पवन माळी, अनिमेश टोले, राहुल पाटील, ह्रषिकेश मेथे-पाटील, संकेत वेसणेकर, ओंकार जाधव, दिग्विजय वाडेकर, आकाश मेस्त्री, सागर पोवार, साहिल निंबाळकर, शुभम साळोखे, सिद्धेश यादव, वृषभ ढेरे, करण चव्हाण-बंदरे, ओंकार माळवी, अनिल शिकलगार, प्रतीक बदामे, श्रेयस मोरे, डॉ. अभिषेक वणिरे (प्रशिक्षक), प्रा. एन. आर. कांबळे (व्यवस्थापक) यांचा समावेश होता.

## ह्रषिकेश मेथे-पाटीलची ट्रिपल हॅट्‌ट्रिक

शिवाजी विद्यापीठ संघाचा आघाडीचा खेळाडू ह्रषिकेशने सोलापूर, उदयपूर, जबलपूर या विद्यापीठ संघाविरोधात हॅट्‌ट्रिक केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2017
सकाळ



कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ

# शिवाजी विद्यापीठाची 'जबलपूर'वर मात

## अखिल भारतीय फुटबॉल स्पर्धेसाठी निवड

कोल्हापूर, ता. ११ : भोपाळ (मध्य प्रदेश) येथे सुरू असलेल्या आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत ऋषीकेश मेथे-पाटील याच्या हॅटट्रिकच्या जोरावर शिवाजी विद्यापीठाने जबलपूर विद्यापीठाचा आज पराभव केला. मिदनापूर (पश्चिम बंगाल) येथे होणाऱ्या अखिल भारतीय स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ पात्र ठरला आहे.

सामन्याच्या दहाव्या मिनिटाला जबलपूर संघाने गोल नोंदवून आघाडी घेतली. २० व्या मिनिटाला राहुल पाटीलच्या पासवर ऋषीकेशने गोल नोंदवून बरोबरी साधली. ३५ व्या मिनिटाला ऋषीकेशने बचावफळी भेदून दुसऱ्या गोलची नोंद केली. जबलपूरने दुसऱ्या गोलची नोंद करून सामन्यात चुरस निर्माण केली. सामना संपण्यास पाच मिनिटे बाकी असताना ऋषीकेशने संधीचे सोने केले आणि तिसऱ्या गोलची नोंद करून ३-२ अशी आघाडी घेतली. जबलपूर संघाने पूर्णवेळेत तोडीस तोड खेळ केला. मात्र सांघिक खेळाच्या जोरावर शिवाजी विद्यापीठाने सामना जिंकला. करण चव्हाण बंदरे, वृषभ ढेरे, अक्षय मेथे पाटील, बदामे, साळवी यांनी चांगला खेळ केला. स्पर्धेत 'शिवाजी'ने बलाढ्य संघांना नमवून विजयी घोडदौड कायम ठेवली. विजेतेपदामुळे 'शिवाजी' संघाची निवड अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी झाली.

**संघ असा** : अक्षय मेथे-पाटील (कर्णधार) ऋषीकेश मेथे-पाटील, रविराज यादव, पवन माळी, अनिमेश टोले, राहुल पाटील, ऋषीकेश मेथे-पाटील, करण चव्हाण बंदरे, संकेत वेसणेकर, ओंकार जाधव, दिग्विजय वाडेकर, आकाश मेस्त्री, सागर पोवार, साहिल निंबाळकर, शुभम साळोखे, सिद्धेश यादव, वृषभ ढेरे, ओंकार साळवी, अनिल शिकलगार, प्रतीक बदामे, श्रेयस मोरे, प्रा. एन. आर. कांबळे (व्यवस्थापक), प्रा. अभिजित वणिरे (प्रशिक्षक).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 JAN 2017

Times of India

# Focus on cashless economy on National Youth Day: UGC

Times News Network

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC) has asked universities across the country to focus on cashless economy while celebrating National Youth Day on Thursday.

In a circular dated January 10, UGC secretary Jaspal Sandhu said, "All the youth organisations should act in a synchronised manner to mobilize youth to carry out a chosen activity all over the country on National Youth Day."

The UGC suggested that each youth should educate at least 10 people about digital mode of transactions. The youths who are not conversant with digital transactions have been asked to learn at least one mode of digital payment.

The circular also says that each youth organisation should hold training programmes on digital payments across the country.

In another circular on December 5, Sandhu had said that participation of youths in higher educational institutions in the campaign for cashless economy is highly relevant because they would be the main beneficiaries of a digital economy that will be free of corruption and black money, as well as completely transparent and just.

He had said that heads of all institutions should educate students in various modes of digital payments and encourage them to join as volunteers for the cashless economy campaign.

He had said that heads of all institutions educate their students in various modes of digital payments and encourage them to join as volunteers for the cashless economy campaign.



## Suggestions for January 12 event

- Each youth who is conversant with digital payments should educate at least 10 persons
- Youth who is not conversant with digital payment should learn at least one of mode of digital payment
- Youth organisation should organise training programmes on digital payments across the country

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 JAN 2017

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात आज चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आज गुरुवार १२ जानेवारी रोजी 'आधुनिक भारताच्या विकासात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाची प्रस्तुतता' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन होणार आहे. हे चर्चासत्र गुरुवार १२ व शुक्रवार १३ जानेवारी या दोन दिवसाच्या कालवधीत होणार आहे. अर्थशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात हे चर्चासत्र होणार आहे, अशी माहिती अधिविभागप्रमुख डॉ. पी.एस. कांबळे यांनी दिली आहे. 'या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी विजापूर (कर्नाटक) येथील प्रा. डॉ. पी. कन्नान यांचे बीजभाषण होणार आहे. विद्यापीठाचे बीसीयुडी संचालक डॉ.डी.आर. मोरे अध्यक्षस्थानी असतील. चर्चासत्रात महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडू, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, गुजरात या राज्यांमधील सत्तरहून अधिक संशोधक शोधनिबंधांचे सादरीकरण करतील.